e-ISJN: A4372-3088
p-ISJN: A4372-3089

ISSN: 2394-3122 (Online)
ISSN: 2394-6253 (Print)
Impact Factor: 6.03

Volume 11, Issue 12, December 2024
SK International Journal of Multidisciplinary Research Hub
Journal for all Subjects
Research Article / Survey Paper / Case Study
Published By: SK Publisher
(www.skpublisher.com)
A Monthly Double-Blind Peer Reviewed Refereed Open Access Multidisciplinary & Multilingual International Journal
Special Issue: Two Day National Interdisciplinary Conference on "Script Writing"
Organised by: Department of Languages, Shankarlal Khandelwal Arts, Science & Commerce College, Akola, Maharashtra 444002.
(Sponsored by Pradhan Mantri Uchchatar Shiksha Abhiyan Grants to Strengthen Colleges)

# आधुनिक संस्कृत साहित्यातील लघुनाट्यलेखन
# (डॉ. देवीप्रसाद खरवंडीकरलिखित 'पञ्चरूपकम्' च्या विशेष संदर्भात)

**डॉ. जयश्री अनिरुद्ध सकळकळे**
सहयोगी प्राध्यापक, संस्कृत विभाग,
शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय, अकोला
DOI: https://doi.org/10.61165/sk.publisher.script.writing.2024.56

प्रस्तावना

भरतमुनिंचे नाट्यशास्त्र हे संस्कृतातील नाट्यशास्त्राचा आद्य ग्रंथ आहे. नाटक आणि अभिनयाच्या संदर्भातील सर्व अंगांचे विस्ताराने विवेचन हे नाट्यशास्त्राचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. धनंजयाचा दशरूपकम्, शारदातनयाचा भावप्रकाशन, सागरनंदीचा नाट्यलक्षणरत्नकोष आदी संस्कृतातील इतर प्रसिद्ध नाट्यशास्त्र विषयक ग्रंथ आहेत. या ग्रंथांच्या निर्मितीनंतर निर्माण झालेली संस्कृत रूपके या मार्गदर्शकतत्त्वांनुसार लिहिली गेली. 18 व्या शतकापासून भारतीय साहित्यकारांचा संबंध वैश्विक साहित्याशी आला आणि संस्कृतात अनेक नवीन साहित्यप्रकार समाविष्ट झाले. फार मोठ्या प्रमाणावर भाषान्तरीत साहित्य संस्कृतात निर्माण झाले. लघुकथा, प्रवासवर्णने आदी नवीन प्रकारात लेखन होउ लागले. स्वातंत्र्यानंतर राज्यनाट्यस्पर्धेच्या निमित्ताने संस्कृत अर्धातासाच्या मंचनाच्या मर्यादेत नाट्यलेखन होऊ लागले. अहिल्यादेवीनगर (अहमदनगर) येथील अहमदनगर महाविद्यायातील डॉ. देवीप्रसाद खरवंडीकर यांनी संस्कृलघुनाट्यसंग्रह पञ्चरूपकम् हा लघुनाट्यसंग्रह लिहिला. यात च्यवनभार्गवीयम्, अपूर्वयोगः, देवमानवः, न कोऽपि हीनः न कोऽपि दीनः, जगत्त्राणाय पर्यावरणम् अशा पाच एकांकीका समाविष्ट आहेत. या एकांकिकांना कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेकम्, अखिल भारतीय रेडिओ नाट्य लेखन, आंतरराष्ट्रीय संस्कृत संमेलन, महाराष्ट्र राज्य शासकीय पारितोषिके आणि प्रमाणपत्रे प्राप्त झालेली आहेत.

भरतमुनिंनी आपल्या नाट्यशास्त्रात रूपकाचे 10 मुख्य प्रकार आणि 18 उपप्रकार सांगितले आहेत. यात भाण, उत्सृष्टिकांक आदी एक अंकी रूपकांचाही समावेश आहे. भाण हा तर एक अंकी आणि एकपात्री रूपक प्रकार आहे. भाणिका असा एक उपरूपकप्रकारही आहे. उत्सृष्टिकांक हे ही एक अंकी रूपक असून करुणरसप्रधान आहे. वीथी या रूपक प्रकारामध्ये

© 2024, SK Publisher All Rights Reserved

नाट्यनृत्यप्रधानता आणि सर्वरसांचा आविष्कार आवश्यक आहे. याखेरीज गोष्टी, नाट्यरासक आणि रासक असेही तीन एकाकीं उपरूपकप्रकार नाट्यशास्त्रकारांनी सांगितले आहे.1

आधुनिक जगाशी संबंध आल्यावर शॉर्ट प्ले किंवा ज्याला लघुनाट्य अशी संज्ञा आहे. ते साधारणतः वीस मिनिटांपासून एक ते सव्वा तासांमध्ये पूर्ण होतात. अशा नाटकांची लोकप्रियता ही त्यांच्यासाठी आयोजित होणाऱ्या अनेक स्पर्धांमुळे फार मोठ्या प्रमाणावर आहे.

डॉक्टर देवीप्रसाद खरवंडीकर यांनी जी नाटकं लिहिलेली आहेत त्याच्यामध्ये पहिले आहे 'च्यवन भार्गवीयम्' ही च्यवन भार्गवाची कथा ब्राह्मण ग्रंथांमध्ये आढळते. शार्यात राजा आपल्या लव्याजम्यानिशी सरस्वती नदीच्या तीरावरी येतो. त्याच्याबरोबर असलेली मुले विटी दांडू चा खेळ खेळतात आणि एका बाजूला च्यवन ऋषी ध्यानस्थ बसलेले असतात. त्यांनी फेकलेली विटी त्यांच्याजवळ जाऊन पडते आणि ते पिशाच्च आहेत असं समजून मुले त्यांना दगड मारतात. तपोभंग झाल्याने ऋषी शार्यताच्या सगळ्या जमातीला शाप देतात आणि मग च्यवन ऋषींना प्रसन्न करण्यासाठी राजा जातो, तेव्हा ते शार्याताची कन्या सुकन्येशी आपला विवाह करून देण्याच्या अटीवर ते शाप मागे घ्यायला तयार होतात. अश्विनी कुमार च्यवन ऋषींच्या आश्रमात येतात सुकन्या आपली पत्नी व्हावी अशी त्यांची इच्छा होते. पण ज्याच्याशी माझा विवाह झाला आहे त्याचा मी त्याग करणार नाही, असे उत्तर ती देते. मग च्यवन ऋषी अश्विनी कुमारांना सोमयज्ञातील सोमग्रहाचं रहस्य सांगतात आणि त्या बदल्यात तारुण्य प्राप्त करून घेतात.2

दुसरे नाटक 'अपूर्वयोगः' यामध्ये रामराव गद्रे यांचा मुलगा प्रभाकर हा एम ए संस्कृतला प्रथमच श्रेणी मिळवून सर्वप्रथम येतो आणि त्याच्या समवेत शिकणारी नलिनी देखील तशीच उत्तीर्ण होते. ते दोघे विवाहासाठी उत्सुक असतात, पण प्रभाकर हा रामरावांचा औरस पुत्र नसून हरबा नावाच्या कोण्या एका अस्पृश्याचा मुलगा आहे, हे नलिनीला समजते. तिचे आई वडील विरोध करतात . अस्पृश्यता ही मानवाने निर्माण केलेली आहे हे रामरावांनी समजावून सांगितल्यावर ते विवाहाला मान्यता देतात व शेवट गोड होतो.3

देव मानव हे एका सामाज कार्य करणाऱ्या व्यक्तीवर आधारित नाटक आहे. भास्करराव तत्त्ववादी यांनी गावाचा सर्वांगीण विकास केला आहे. त्यांची वैदही उपाध्ये हिने त्यांची घेतलेली मुलाखत म्हणजे हे नाटक आहे. त्यांना सामाजिक कार्य करतांना आलेल्या अनेक अडचणी आणि त्या अडचणींवर त्यांनी केलेली मात, त्यांचा मुलगा अमेरिकेत स्थायिक होतो पण नंतर तो पुन्हा स्वदेशी येऊन वैद्यकीय सेवा ऋद्धिपूरात सुरू करतो. अशा प्रकारे शेवट गोड होतो.4

'न कोऽपि हीनः न कोऽपि दीनः' हे आद्य शंकराचार्यांच्या 'मनीषापञ्चकम्' या स्तोत्रावर आधारित एकांकिका आहे. काशी विश्वेश्वराचे दर्शन घेण्यासाठी शंकराचार्य गेले असताना एक हरिजन अंत्यज्य त्यांच्या वाटेवर आडवा येतो. शिष्य संतापतात पण शंकराचार्य शांत असतात. हा कोणी सामान्य नाही हे त्यांच्या लक्षात येते आणि प्रत्येकाच्या हृदयात परमेश्वराची वस्ती असते. त्यामुळे ब्राह्मण, गाय, हत्ती, कुत्रा, चांडाळ आदी सर्व जीवांना ज्ञानवंत एकसमान मानतात. यावर शिवाने आपली परीक्षा घेतल्याचे

शंकराचार्यांच्या लक्षात येते. राष्ट्राच्या प्रगतीसाठी सामाजिकजातीयआर्थिक भेदभावनांना तिलांजली द्यायला हवी हा संदेश देणारी ही एकांकिका आहेत.5

'जगत्त्राणाय पर्यावरणम्' पर्यावरणाचे रक्षण व्हायला हवे हे सांगणारी एकांकिका आहे. विद्यार्थी आणि शिक्षक यांच्या संवाद व परिसंवादावर चर्चात्मक अशी ही एकांकिका आहे. पर्यावरण म्हणजे काय? शुद्धीकरण कसे होईल ? प्रदूषणामुळे पर्यावरणाची आणि मानवी जीवनाची कशी हानी होते? हे सर्व प्रश्न गुरु शिष्यांच्या संवादातून साकार होतात. अशा प्रकारे ही एकांकिका आहेत.6

संस्कृत मध्ये मोठ्या अंकांची आणि मोठ्या नाटकांची व प्रकरणांची एक परंपरा आहे. संस्कृत नाटकाचे कथानक हे मुख, प्रतिमुख, गर्भ, विमर्श आणि निर्वहण अशा पंचसंधीच्या साहाय्याने आणि प्रक्रियेतून मांडण्याची फार जुनी परंपरा आहे. अर्थात भरतमुनींनी प्रतिपादित केलेल्या लहान नाटकांमध्ये म्हणजे उत्कृष्टिकांक, वीथी आणि भाण याच्या मध्ये भान हे एकांकिका आणि एकपात्री प्रयोग आहे तर वीथी हे नृत्य नाट्यमय असल्यामुळे त्याचा संबंध हा पथनाट्याशी आपल्याला जोडता येतो. उत्कृष्टिकांक हा करुणा रस प्रधान असल्यामुळे तिथे विषयाला मर्यादा आहेत.

आधुनिक लघुनाट्यात मात्र एखाद्या लहानसे कथानक कमीत कमी पात्रांमध्ये एक छोटीशी कथावस्तू. त्या कथा वस्तूमध्ये सुरुवात, मध्य आणि शेवट अशा प्रकारचे टप्पे, मर्यादित व वेगवान कथानक, स्पष्ट संघर्ष आणि संकल्पना आणि कमीत कमी दोन ते तीन प्रवेश असे या आधुनिक लघुनाट्याचे स्वरूप आहे.

अशाच प्रकारची नाटक देवीप्रसाद खरवंडीकर यांनी रचलेली आपल्याला दिसतात लघुनाट्य यांची लांबी कमी असल्यामुळे त्यात पाचही संधी शक्य नाही त्यामुळे कथा मुख त्यामध्ये येणारी छोटीशी गर्भ संधी म्हणजेच संघर्ष आणि कथानकाचा तात्काळ शेवट असें सूत्र देवीप्रसाद खरवंडीकर यांनी अवलंबिलेले दिसते. देवमानव हा या नाटकांमध्ये त्यांनी फ्लॅशबॅक मध्ये अनेक प्रवेश टाकले आहेत. हे नाटक तुलनेने बरेच मोठे आहेत यामध्ये भाऊसाहेबांच्या तरुणपणच्या आणि त्यांनी केलेल्या संघर्षांचे प्रवेश आपल्याला फ्लॅशबॅक मध्ये दिसून येतात त्यांच्या मार्गात येणाऱ्या अडचणी अशा फ्लॅशबॅक मध्ये सांगून त्यांचे जीवन उलगडलेले आपल्याला दिसते हा एक नवीन प्रयोग देवीप्रसाद खरवंडीकर यांनी या नाटकांमध्ये केलेला आपल्याला दिसतो. नवीन कथा वस्तू हाही एक देवीप्रसाद खरवंडीकर यांच्या या नाटकांचा विषय आहे.

बाकीच्या कथा मात्र फार आधुनिक आहेत. अस्पृश्यतेसारखा विषय यात अत्यंत उत्तम प्रकारे हाताळलेला आपल्याला दिसून येतो. तसेच पर्यावरण या नाटकाचा या नाटकाचे लेखन हे माहितीवजा आहे. त्यामुळे या नाटकाची संहिता अत्यन्त साधी व सरळ स्वरूपाची आहे. यामध्ये शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या संवादातून आणि चर्चेतून पर्यावरण विषयक अनेक मुद्दे फक्त आपल्यासमोर सादर होतात. यामध्ये कथामुख, संघर्ष व शेवट अशा प्रकारचा एक नाटकाची प्रक्रिया आहे ती यामध्ये आपल्याला दिसत नाही. ती आपल्याला प्रकर्षाने दिसते ती म्हणजे 'अपूर्वयोगः' हा या नाटकांमध्ये. देवमानव हा या नाटकांमध्ये त्यांचे संपूर्ण जीवन उलगडत असताना त्यांचं एकेका क्षेत्रातलं म्हणजे दारूबंदी असेल किंवा सामाजिक समता असेल अन्याय असेल

SK International Journal of Multidisciplinary Research Hub
Volume 11, Issue 12, December 2024 pg. 277-281

आणि त्या विरुद्ध झालेला संघर्ष, एकेका प्रसंगानुसार प्रवेश सादर झालेले आपल्याला दिसतात त्यामुळे तो देखील एक त्यांच्या जीवनाचा पट उघडणे आहे. त्यांचा संघर्ष प्रकाशित करणे आहे. फक्त त्यांचा मुलगा पुन्हा भारतामध्ये परत येतो आणि ऋद्धिपुर येथे आपली वैद्यकीय सेवा देतो. वैयक्तिक आयुष्यातील एकाकीपणाची समस्या सुटून समाधान प्राप्त झाल्याचे आपल्याला दिसते.

च्यवनभार्गवीयम मध्ये कथेचा कुठेही बदल त्यांनी केलेला आपल्याला दिसत नाही. जशी ब्राह्मण ग्रंथांमध्ये कथा आपल्याला या नाटकामध्ये दिसते. त्यात छोटासा दांडायन आणि तांडायन या मुलांचा एक छोटसा प्रवेश त्यांनी त्यामध्ये नाट्य स्वरूप देताना म्हणून समाविष्ट केलेला आहे. पण नाटक हे रोचक बनवण्याकरता मूळ संहितेत कुठेहीप्रमुख बदल त्यांनी केलेला नाही. च्यवनभार्गव याची कथा ही ब्राह्मण ग्रंथात इतकी जुनी असली तरी तिला किंचित जरठ कुमारी विवाह अशा प्रकारचे रूप दिल्याचे लक्षात येते. कथा नाट्यस्वरूपात मांडणे हाच उद्देश इथे दिसतो.

शंकराचार्यांची कथा देखील जशी आहे तशीच येते पण त्यामध्ये त्याला सामाजिक दृष्टी आणि त्याला सामाजिक समस्यांचा आणि सामाजिक समतेचा संदेश असल्यामुळे त्या नवीन कथेची जुन्या कथेची एक नवीन बाजू इथे दाखवण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला आहे.

**निष्कर्ष**

या पाचही नाटकांचे विषय वेगवेगळे आहेत त्या अनुषंगाने आपल्याला डॉक्टर देवीप्रसाद खरवंडीकर यांनी संहितालेखन केलेले दिसते. हे संहितालेखन करताना कुठलंही एक नियम त्यांनी योजलेला नाही आणि त्यामुळे या पाचही नाटकांच्या संहिता लेखनामुळे मध्ये आपल्याला कमालीचे वैविध्य आढळते. संहिता लेखनाच्या या वैविध्यमुळे, नाटकांच्या लांबींना असलेल्या मर्यादेमुळे आणि वेळेला असलेल्या मर्यादेमुळे आणि संस्कृतभाषा सर्व स्तरातील प्रेक्षकांपर्यन्त पोहोचविण्याच्या उद्देशाने उपयोजित सरलसंस्कृत भाषेमुळे अनेक वेळेला कथेमधील संघर्ष थोडासा कमी प्रभावी झाल्याचं आपल्याला दिसते. जसा पर्यावरण रक्षण यामध्ये संघर्ष नाही.

अशाप्रकारे संहिता लेखन म्हणजे नाट्य संहिता लेखनाच्या बाबतीमध्ये अनेक प्रयोग आधुनिक संस्कृत साहित्यामध्ये झाले. इंग्रजी लघुनाट्याच्या पद्धतीचे लघु नाट्य आणि स्पर्धांच्या दृष्टीने केले जाणारे लघुनाट्यलेखन या दोनही गोष्टींमधून आवश्यक त्या तत्त्वांचा अंगीकार करून संस्कृत मध्ये नाटक लिहिण्याची जी परंपरा महाराष्ट्रामध्ये निर्माण झाली त्यामध्ये डॉ. देवीप्रसाद खरवंडीकर यांचा एक मोलाचा वाटा असलेला असल्याचा आपल्याला दिसतो.

संदर्भ:

1) दशरूपकविकल्पनम्, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई

2) डॉ. देवीप्रसाद खरवंडीकर, पञ्चरूपकम्, सेंटर फॉक अडव्हान्स स्टडी इन संस्कृत, पुणे विद्यापीठ, पुणे.2009, पृष्ठ 15

3) तत्रैव, पृष्ठ 31

4) तत्रैव, पृष्ठ 49

© 2024, SK Publisher All Rights Reserved

5) तत्रैव, पृष्ठ 77

6) तत्रैव, पृष्ठ 83

:::. Cite this article .:::

सकळकळे, डॉ. जयश्री अनिरुद्ध. (2024). आधुनिक संस्कृत साहित्यातील लघुनाट्यलेखन (डॉ. देवीप्रसाद खरवंडीकरलिखित "पञ्चरूपकम्" च्या विशेष संदर्भात). Two Day National Interdisciplinary Conference on Script Writing, 277–281. https://doi.org/10.61165/sk.publisher.script.writing.2024.56